दाखल तारीख २५/०६/२०१८
नोंदणी तारीख २५/०६/२०१८
निकाल तारीख ०९/०४/२०२६
कालावधी ०७वर्षे,०९म,१५दि

**भाग अ**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)}**

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.२३** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- वाय.जे.वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. २६६/२०१७<br>पोलिस स्टेशन चामोर्शी, |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०९/०४/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २०६/२०१८ |
| | CNR No. **MHGA090004292018** |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट् शासन<br>मार्फत पोलिस स्टेशन, चामोर्शी. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री.एस.एस.सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | हरिचंद्र मनिराम जाधव,<br>वय ४५ वर्षे, व्यवसाय- शेती,<br>रा. पांढरी भटाळ,<br>ता. चामोर्शी, जि.गडचिरोली. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. व्हि. जी. चिळंगे**<br>(बचाव पक्षातर्फे वकील) |

**भाग ब**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)}**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७/०८/२०१७ |
| पहिल्या खबरीची तारीख | २७/०८/२०१७ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २५/०६/२०१८ |
| गुन्हयाचे विवरणपत्र तारीख | १०/०८/२०१८ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ३०/०३/२०२१ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०९/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०९/०४/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | हरिचंद्र मनिराम जाधव | ०५/१०/२०१७ | १०/१० २०१७ | कलम ६५ (ई) म.दा.का. | निर्दोष मुक्त | लागु नाही. | लागु नाही. |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

### भाग क
### {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)}
### अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र. १ | निर्मला मुरलीधर कुंभमवार | पंच |
| सा.क्रं. २ | माधुरी गणपत मेश्राम | पंच |

### अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने निशाणीबध्द दस्तांची यादी

**ब. <u>बचाव साक्षीदार, असल्यास</u> :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. <u>न्यायालयीन साक्षीदार, असल्यास</u> :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी क्रंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-१८**/सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २ | निशाणी/**पी-१९**/सा.क्र.१ | मालमत्ता शोध व जप्ती नमुन्यावरील सही |
| ३ | निशाणी/**पी-२१**/सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| ४ | निशाणी/**पी-२२**/सा.क्र.२ | मालमत्ता शोध व जप्ती नमुन्यावरील सही |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी क्रंमाक | विवरण |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रमांक | निशानी क्रंमाक | विवरण |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | निशानी क्रंमाक | विवरण |
|---|---|---|
| | **--निरंक--** | |

**न्यायनिर्णय**

(आज दिनांक ०९ **एप्रिल** २०२६ रोजी घोषीत)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये चालविण्यात आला.

फिर्यादी पोलीस उपनिरीक्षक गोपाल ढोले यांनी दिनांक २७.०७.२०२२ रोजी फिर्यादी दिली की, दिनांक २७.०७.२०२२ रोजी पोलीस स्टेशनला हजर असतांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजा पांढरी भटाळ येथील इसम नामे मंगरु फतु राठोड हा त्याच्या राहते घरी अवैध्यरित्या हातभटटी मोहा दारू गाळुन विक्री करीता बाळगतो व मोहादारु गाळण्याकरीता मोहासडवा साठविला आहे. सदरची माहिती प्रभारी अधिकारी यांना देवुन त्यांच्या आदेशान्वये ते व ईतर पोलीस कर्मचारी मौजा पांढरी भटाळ येथे खाजगी वाहनाने रवाना झाले. त्यानंतर मौजा येडानुर येथे पोहचुन तेथील दारुबंदी समितीच्या दोन महिलांना बोलावुन त्यांना माहिती दिली आणि मौजा पांढरी भटाळ येथील रतन लालु जाधव याच्या घरी जावुन पंचनामा कार्यवाही करत असताना त्यांना मुखबीराव्दारे खबर मिळाली की, मौजा पांढरी भटाळ येथील हरिचंद

मनिराम जाधव हा त्याच्या राहते घरी अवैधरित्या हातभटटी मोहादारु विक्री करीता बाळगतो तसेच मोहादारु गाळण्याकरीता मोहासडवा साठविला आहे. त्यानंतर त्याच्या घराकडे जात असताना एक इसम पळुन जाताना दिसला व पंचानी त्यास पाहुन हरिचंद मनिराम जाधव असे सांगितले. त्यानंतर त्यांनी व पंच मिळुन त्याच्या घराच्या चाफयाची पंचासमक्ष पाहणी केली असता १० लिटर द्रव्य मिळुन आले व पंचाना वास घेण्यास सांगितले असता त्यांनी आंबट व उग्र वास येत असुन हातभटटी मोहादारु असल्याचे सांगितले. तसेच चाफयामध्ये घराचे भिंतीलालगत जमिनीमध्ये पुरलेली प्रत्येकी २०० लिटर क्षमतेच्या ०२ निळया रंगाच्या प्लॉस्टीक ड्रममध्ये ४०० लिटर मोहासडवा दारु गाळण्याच्या उददेशाने मिळुन आला. त्यानंतर जप्त मालामधुन प्रत्येकी १८० मी.ली. मापाची एका बाटलमध्ये मोहादारु व मोहासडवा रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढल्यानंतर ती पोलीसांच्या व पंचाच्या सहीने सील करण्यात आली व उर्वरित मोहादारु व मोहासडवा मोक्यावर नाश केले. त्यानंतर पोलीस कर्मचारी नमुना बॉटल घेवुन पोलीस स्टेशनला परत आले. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्यादवरुन अपराध क्रं. २६६/२०१७ नुसार महाराष्ट् दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई), (फ) अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

३. सदर गुन्हयाचा तपास पोलिस शामराव वडेटटीवार यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयान नोंदविले व नमुना म्हणुन काढण्यात आलेली बॉटल रासायनिक प्रयोगशाळा नागपुर येथे पाठविला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई),(फ) अंतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी निशानी क्र. ११ वर आरोपीविरुध्द आरोप निश्चीत केले. ते त्याला त्याच्या मातृभाषेत समजावुन सांगण्यात आल्यानंतर आरोपीनी आरोप अमान्य करुन खटल्याला सामोरे जाण्यास तयारी दर्शविली.

५. माझ्या समक्ष विचारासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. मी मुद्दयाच्या समोर माझे निष्कर्ष नोंदविल्यानंतर त्याबद्दलच्या कारणमिमांसेचे विवेचन केलेले आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक २७.०८.२०१७ रोजीचे १६.४५ ते १७.४५ वाजताचे दरम्यान मौजा पांढरीभटाळ, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या राहते घरी १० लिटर हातभटटी मोहादारू व दोन ड्रममध्ये ४०० लिटर मोहासडवा एकुण किंमत २५,०००/- चा माल विनापरवाना अवैध्यरित्या दारु विक्री करण्याच्या उददेशाने व मोहासडवा बाळगुन दारु गाळण्याच्या उददेशाने मिळून आल्याने आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) नुसार गुन्हा केला आहे असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २ | अंतिम आदेश काय? | अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकुण दोन पंच साक्षदार तपासले. सदर दोन्ही पंच साक्षदारांनी अभियोग पक्षाला सहाय न केल्याने अभियोग पक्षाची पुराव्याची बाजु बंद करण्यात येवुन आरोपीचे फौ. प्र.सं. चे कलम ३१३ अंतर्गत जबाब नोंदविण्यात आले नाही.

**मुद्दा क्र.१ व २ बाबत :**

७. पंच साक्षीदार क्रं. १ याने त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, तो आरोपीला ओळखतो. पोलिसांनी त्याला पंच म्हणुन कुठेही बोलावले नव्हते व त्याच्या समक्ष काहीही जप्त करण्यात आले नव्हते. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा व मालमत्ता शोध व जप्ती पंचनाम्यावर त्याच्या सहया असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्यांना फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु, त्याला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे अभियोग पक्षाच्या बाजुने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

८. पंच साक्षीदार क्रं. २ याने त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, तो आरोपीला ओळखतो. दि. २७.०८.२०१८ रोजी पोलिसांनी दारु जप्तीची कार्यवाही केली नाही. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा व मालमत्ता शोध व जप्ती पंचनाम्यावर

त्याच्या सहया असुन त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य न केल्याने अभियोग पक्षातर्फे त्याला फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु, त्याला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले. त्यामुळे अभियोग पक्षाच्या बाजुने कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

९. पंच साक्षीदार क्र.१ व क्र.२ यांनी त्यांचे समक्ष मोहादारू व मोहासडवा जप्ती करण्यात आली नसल्याचे कथन करुन जप्ती पंचनाम्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले आहे. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा स्वतंत्र पंच साक्षीदारांच्या साक्षने सिध्द करणे गरजेचे होते, परंतु त्याप्रमाणे कोणताही स्वतंत्र पुरावा अभिलेखावर आला नाही. अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यासाठी सबळ व विश्वासार्ह पुरावा सादर केला नाही. अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यास पुरेसा नाही. वरील कारणांमुळे आरोपीवरील लावण्यात आलेला दोषारोप संशयाच्यापलीकडे जावुन शाबीत होत नाही म्हणुन आरोपीला संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल परिणामी मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्रं. २ च्या निर्ष्कषाच्या अनुषगांने खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१ आरोपी नामे हरिचंद्र मनिराम जाधव याला फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५ (१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) या गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ जप्त मुददेमाल १० लिटर हातभटटी मोहादारू व दोन ड्रममध्ये ४०० लिटर मोहासडवा घटनास्थळावर नाश केले असल्याने त्याबाबत कोणताही आदेश नाही.

३ आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४ आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे रक्कम रु. १५,०००/- चा नविन जमानती बंधपत्र दयावे. सदर बंधपत्राची मुदत पुढील सहा महिण्यापर्यत राहील. सदर कालावधीत आव्हान न झाल्यास बंधपत्र रद्द होईल.

५ न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.04.09 17:32:28 +0530

चामोर्शी.
दिनांक : ०९/०४/२०२६

{वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.